क्रमांक : ५६७२ / क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २५ मार्च, २०२६

संदर्भ :- **१) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.३०४५/क-१, दिनांक २० फेब्रुवारी, २०२६**
**२) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.३६४६/क-१, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६**

:: कार्यालयीन आदेश ::

बुधवार, दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी समाप्त होणाऱ्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन कालावधीत या सचिवालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या अतिरिक्त कामाचा विचार करुन या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना **शुक्रवार, दिनांक २७ मार्च, २०२६ रोजी सुट्टी देण्यात येत आहे.** त्याचप्रमाणे संदर्भ क्र.१ वरील परिपत्रकान्वये सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कार्यालयीन कामकाजाकरीता कार्यालयात उपस्थित राहिलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना सदर दिवसाची **बदली रजा सोमवार, दिनांक ३० मार्च, २०२६ रोजी** देण्यात येत आहे.

तसेच संदर्भ क्र.२ वरील परिपत्रकान्वये शासकीय सुट्टीच्या दिवशी कार्यालयात उपस्थित राहिलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना उक्त **एक दिवसाची बदली रजा दिनांक ३१ मार्च, २०२७ पर्यंत वरिष्ठांच्या पूर्व परवानगीने उपभोगता येईल.**

आदेशानुसार,

**( मोहन काकड )**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

टीप :- **शुक्रवार, दिनांक २७ मार्च, २०२६ व सोमवार दिनांक ३० मार्च, २०२६ रोजी या सचिवालयातील "क-२" (संगणक) कक्ष, "क-३"(लेखा) कक्ष, "क-४" (अर्थसंकल्प) कक्ष, "ग-१" (सामान्य) कक्ष, "ग-२" (सामुग्री) कक्ष व "ह" (सदस्यांचे वेतन व भत्ते आणि निवृत्तीवेतने) कक्ष या कक्षातील अधिकारी/कर्मचारी कार्यालयीन कामकाज तसेच वित्तीय वर्षातील ३१ मार्च ही अंतिम तारीख असल्याने लेखाविषयक कामकाज विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यालयात उपस्थित राहतील. सदर दिवसाची बदली रजा त्यांच्या विनंतीनुसार देय राहील.**

..२/-

**प्रति,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव

२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव

३) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

४) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

५) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

६) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

७) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

८) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी

१०) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

११) या सचिवालयातील सर्व समिती प्रमुख यांची कार्यालये

१२) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष

१४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कर्मचारी

१५) व्यवस्थापक उपाहारगृह, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१६) निवडनस्ती

**प्रतिलिपी :-**

१) सर्व मंत्रालयीन विभाग.

२) उप अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

३) शाखा अभियंता (स्थापत्य), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय